PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

कृपया प्रसिध्दीसाठी

# उत्तम खेळाडू घडवण्यासाठी सक्षम संघटनेची गरज
# १३ व्या पार्ले महोत्सवात विनोद तावडे यांचे प्रतिपादन

मुंबई दि.२९: उत्तम खेळाडू घडवण्यासाठी सक्षम संघटनेची गरज असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदचे विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी केले. १३ व्या पार्ले महोत्सवाच्या 'पार्ले महोत्सव श्री २०१२' या शरिरसौष्ठव स्पर्धेच्या निमित्ताने ते बोलत होते. पार्ले महोत्सवाच्या या व्यासपीठावर सर्व शरिरसौष्ठव क्षेत्रीतील संघटना व दिग्गज एकत्र येणे ही बाब बॉडीबिल्डर्स घडवण्यासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला. १३ वर्षे पार्ले महोत्सवाचे आयोजन करून दरवर्षी भव्य स्वरुपात साजरा केल्याबद्दल त्यांनी पार्ले महोत्सवाचे आयोजक ॲड. पराग अळवणी आणि सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी श्री.विनोद तावडे यांच्यासह श्री.चेतन पाठारे , दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त श्री. भाई कदम, श्री.मधुकर तळवळकर, श्री. बप्पी पाटील, श्री.सुनिल शेडगे आदी मान्यवर मंडळी प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते.

पार्ले महोत्सवातील सर्वात लोकप्रिय असलेल्या शरिरसौष्ठव स्पर्धेत सुमारे २०० स्पर्धकांनी भाग घेतला. दरवर्षी ६ वजनी गटात घेतल्या जाणाऱ्या या स्पर्धेत यावर्षी स्पर्धकांच्या वाढत्या प्रतिसादामुळे ५५ वजनी या नवीन गटाचा समावेश करून एकूण ७ वजनी गटात ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धा पाहण्यासाठी पाच हजाराहून अधिक तरुणांनी गर्दी केली होती. प्रत्येकी ७ वजनी गटात झालेल्या या स्पर्धेत स्पर्धकांना प्रेक्षकांमधून भरघोस प्रतिसाद मिळत होता. 'पार्ले महोत्सव श्री २०१२' हा किताब श्री.संजय हेगडे यांच्या हस्ते सागर कातुरडेला प्रदान करण्यात आला तर बेस्ट पोझर नितीन म्हात्रे याला श्री.निखिल राजपुरीया यांच्या हस्ते किताब देण्यात आला.

पार्ले महोत्सवाच्या ६ व्या दिवशी शरिरसौष्ठव स्पर्धेबरोबरच रेकॉर्ड डान्स, समूह नृत्य, बुध्दीबळ, वकृत्व, एकपात्री प्रयोग इत्यादी स्पर्धांची सुरूवात झाली. सर्व स्पर्धांना भरघोस प्रतिसाद मिळत सुमारे ३ हजार स्पर्धाकांनी भाग घेतला. शरिरसौष्ठव स्पर्धे प्रमाणेच समूह नृत्य स्पर्धा पाहण्यासाठीही साठे महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रेक्षकांनी प्रचंड प्रमाणात गर्दी केली होती. स्पर्धकांनी बॉलीवूड नृत्या बरोबरच, वेस्टर्न, पारंपारिक लोकनृत्य सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. या प्रसंगी श्री.एस.के. वानी, डॉ.विक्रम रोठे, श्री. प्रभाकर कदम, नगरसेविका सौ.ज्योती अळवणी आदी मान्यवर उपस्थित होते.

---

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.